# राजाभाऊ (पराग) प्रकाश वाजे

विधानसभा सदस्य


जा.क्र.विसस/आरपीडब्ल्यू/सिन्नर/ ६३४ /२०१६

दि :- २१/०५/२०१६

प्रति,

**मा. जिल्हाधिकारी सो.**

जिल्हाधिकारी कार्यालय,

नाशिक

**विषय- उन्नत महाराष्ट्र अभियानांतर्गत, सिन्नर तालुक्याच्या सिंचन आराखड्याचे दुष्काळ व पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता या दृष्टीकोनातुन मुल्यांकन अहवाल तयार करणे बाबत...**

**महोदय,**

उन्नत महाराष्ट्र अभियान, हा प्रकल्प शासन निर्णय क्र. 201601131501523808 (१३ जानेवारी २०१६, उच्च व तंत्र शिक्षण विभाग) व क्र. 201604071253047516 (७ एप्रिल २०१६, नियोजन विभाग) या प्रमाणे राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत प्रादेशिक विकासाच्या प्रश्नांवर तंत्रशिक्षण संस्थांकडून 'प्रोजेक्ट' या तत्वावर अभ्यास करून घेण्याची सोय आहे. यासाठी लागणारा निधी व डाटा उपलब्ध करून देण्याचे मार्ग सुद्धा या अभियानात समाविष्ट आहेत.

आपल्याला माहित असेलच की नाशिक जिल्ह्याचे अनेक भाग हे एका भीषण दुष्काळाच्या छायेत आहेत. यामध्ये पाण्याअभावी शेतीचे नुकसान व पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या आपल्या समोर आहे. हे चक्र आता वारंवार येत असून यासाठी नियोजनाची गरज आहे. नुकतेच प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेच्या अंतर्गत तालुका निहाय जिल्हा सिंचन आराखडा तयार करण्यात येत आहे असे समजते, या आराखड्यामार्फत आपल्या जून्या छोट्या सिंचन योजना यांचे पुनरुज्जीवन होणे अत्यंत आवश्यक आहे. याच बरोबर कोरडवाहू शेती व पिण्याचे पाणी हे चिंतेचे विषय आहेत व त्यात सुद्धा नियोजनाची गरज आहे. या सर्व प्रश्नावर उन्नत महाराष्ट्र या सदराखाली आय. आय. टी. बॉम्बे (IIT Bombay) सारख्या संस्थेचे मार्गदर्शन लाभले तर ते चांगलेच आहे .

या ३ विषयांवर उन्नत महाराष्ट्र अभियान या खाली आय. आय. टी. बॉम्बे (IIT Bombay) च्या TDSC या उपसंस्थेशी चर्चा होऊन एक पायलट प्रोजेक्ट (pilot project) सुरु करावा अशी विनंती. यामध्ये खाली नमूद केलेले मुद्दे घेण्यात यावे:

१. देवनदी सारखे इतर फड सिंचन प्रकल्प यांचे पुनरुज्जीवन याचा feasibility study.

२. सिन्नर तालुक्याच्या सिंचन आराखड्याचे दुष्काळ व पिण्याचे पाण्याची सुरक्षितता या दृष्टीकोनातुन मुल्यांकन.

यासाठी लागणारा निधी व डाटा (सिंचन विभाग, कृषी विभाग, भूजल विभाग, अर्थ व सांख्यायिकी विभाग) या बद्दल सुद्धा मार्गदर्शन व्हावे.

आपला

राजाभाऊ (पराग) वाजे

वि. स. सदस्य, सिन्नर

**प्रत- मा. श्री. मिलिंद सोहनी, अध्यक्ष, उन्नत महाराष्ट्र अभियान, IIT, मुंबई.**


'शिवबापूर', नाशिक-पुणे रोड, सिन्नर, जि.नाशिक. पिन ४२२ १०३.

फोन : ०२५५१-२२३६२७, Email: rajabhauwaje@gmail.com